ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५२ • मंगळवार दि.१७ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

मंत्रिमंडळाचे चार महत्त्वाचे निर्णय

सुनेत्रा पवारांकडून मुख्यमंत्री सहायता निधीस धनादेश सुपूर्द



मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमात सुधारणा, पालघर जिल्ह्याचा वस्त्रोद्योग धोरणात झोन-१ मध्ये समावेश, पालघर येथे जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना आणि नक्षलवाद्यांनी लुटलेल्या शस्त्रांची माहिती देणाऱ्यांसाठी रोख बक्षीस योजना जाहीर करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. दरम्यान, राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांनी एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी वेतनाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मंगळवारी घेण्यात आली. या बैठकीत चार महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्यातील उच्च व तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. बदलत्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन ही सुधारणा करण्यात येणार आहे. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा करून पालघर जिल्ह्याचा झोन-१ मध्ये समावेश करण्यात आला आहे. झोन- ची वर्गवारी रद्द **पान ४ वर**

मुख्यमंत्र्यांवरील आरोपावरुन भाजप-राष्ट्रवादीत संघर्ष पेटला

आरोपांना भाजपचा पलटवार तर योग्य वेळी उत्तर-आ.पवारांचा इशारा



मुंबई/प्रतिनिधी- दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ.रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अपघातातील संभाव्य दोषींना पाठीशी घालत असल्याचा आरोप केल्यानंतर भाजप नेत्यांनी त्यांच्यावर पलटवार केला आहे. भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी रोहित पवार यांच्या साखर कारखान्यातून निघणाऱ्या धुरामुळे बारामती विमानतळ परिसरातील दृश्यमानता कमी झाली होती का, याची चौकशी करण्याची मागणी केली. तर भाजप आ.प्रसाद लाड यांनी शरद पवार यांना पत्र लिहून रोहित पवारांच्या आरोपांबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट करण्याचे आव्हान दिले आहे. तर आ.रोहित पवार यांनी भाजपच्या आरोप व इशाऱ्यांना योग्य वेळी उत्तर देवू असा इशारा दिला आहे.

आ.रोहित पवार यांनी काल १६ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस यांचा मफलर घातलेला फोटो दाखवत त्यांच्यावर गंभीर आरोप केले होते. अपघातातील संभाव्य दोषींना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. या आरोपांना अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. प्रसाद लाड यांनी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांना रोहित पवारांच्या आरोपांबाबत पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेतल्यानंतर रोहित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. आपण येथे केवळ अभिवादनासाठी आलो असून राजकीय भूमिका मांडणार नसल्याचे त्यांनी **पान ४ वर**

न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर;मागण्या मान्य होईपर्यंत लढा सुरुच राहणार



नांदेड/प्रतिनिधी-उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करण्यात यावी, या प्रमुख मागणीसह प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्यावतीने आज (मंगळवार) दि.१७ नोव्हेंबर पासून बेमुदत संप पुकारला आहे. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे नांदेड जिल्हा सत्र न्यायालयातील कामकाज ठप्प झाले.

दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयानेच न्यायमूर्तींची समिती गठित करुन सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव जानेवारी २०२५ मध्येच शासनास सादर केला असतांना देखील शासनाने अद्यापर्यंत या प्रस्तावाची अंमलबजावणी केली नसल्याने महाराष्ट्र राज्य न्यायालय कर्मचारी महासंघाच्या वतीने शासनास ऑगस्ट २०२६ मध्ये ९० दिवसांची पुर्वसुचना इशारा वजा नोटीस देण्यात आली होती. परंतु शासनस्तरावरुन अद्याप कोणतीही हालचाल न होता शासनाने या नोटीसला केराची टोपली दाखविली आहे त्यामुळे राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचा-यांमध्ये शासनाविरुध्द प्रचंड रोष निर्माण झाला होता परिणामी त्याचे रुपांतर आजच्या बेमुदत संपात झाले आहे. हा लढा यापुढे सुरुच राहणार असून आम्ही आमचा हक्क मागतोय भीक नाही अशी वल्गना न्यायीक कर्मचा-यांनी केली आहे. मागणी तात्काळ पुर्ण न झाल्यास लढा आणखी तीव्र करण्याचा इशारा नांदेड जिल्हा तृतीय श्रेणी न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष नागेश गिरगावकर, सचिव विनोद पाथरकर, बालाजी खिंडरे, मकबुल शेख यांच्यासह मो. फसीओद्दीन सिद्दिकी दिला आहे. यावेळी सुनील कोटगिरे, अशोक राठोड, रविंद्र व्यवहारे, माधव जडीले, श्रीमती मीनादेवी खांडरे, डी. पी. विराट, बबन गजभारे, बालाजी जायमेत्रे, व्ही.जी. सुरुकुटवार, जे.जे.पांडे, ए. आर. यन्नावार, संतोष पुरी, सतीश वैद्य, सुरेश कात्रे, आर. आर. संगनवार, पी.एन. चांदुरकर, शेख अखिल अहेमद यांच्यासह मोठया संख्यने न्यायालयीन कर्मचा-यांची लक्षणीय उपस्थिती होती.

अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या दोन हायवा पोलीसांनी केल्या जप्त



नांदेड/प्रतिनिधी-गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करुन अवैधरित्या हायवामध्ये घेवून जात असतांना नांदेड ग्रामीण पोलीसांनी सोमवारी सायंकाळी वाडी पाटी व भगवानबाबा चौक येथे दोन हायवा पकडल्या आहेत. या प्रकरणी तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचारी गस्त घालीत असतांना वाडी पाटीजवळ हायवा ट्रकमधून रेती घेवून जात असल्याचे आढळून आले. पोलीसांनी हायवा ट्रक क्र.एमएच २६ बी.डी.-४१०० थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये पाच ब्रास रेतीचा साठा आढळून आला. पोलीसांनी हायवा व रेती असा ४० लाख २५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. हायवा ट्रक चालक गणेश दशरथ गायकवाड यास अटक केली असून त्याच्या विरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांच्या **पान ४ वर**

नांदेड जिल्हा ग्रंथालयात दीडशेहून अधिक दिवाळी अंकांचे प्रदर्शन

नांदेड/प्रतिनिधी-दिवाळी अंकांची समृद्ध परंपरा जपत वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व डिजिटल उपकेंद्र, नांदेड यांच्या वतीने आयोजित दीडशेहून अधिक दिवाळी अंकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे यांच्या हस्ते करण्यात आले. बहुउद्देशीय सांस्कृतिक संकुल, स्टेडियम परिसरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाशेजारील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

या प्रदर्शनात दिवाळीनिमित्त प्रकाशित झालेले नामवंत नियतकालिकांचे विशेषांक तसेच कला, संस्कृती, साहित्य, बालसाहित्य, कथा, कविता, वैचारिक लेख, विज्ञान आणि महिला विषयक विविध दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मराठी साहित्यात दिवाळी अंकांची अनेक दशकांची समृद्ध परंपरा असून, महाराष्ट्राच्या वैचारिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत या अंकांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. नवोदित लेखकांना आपले विचार आणि लेखन मांडण्यासाठी दिवाळी अंक महत्त्वाचे व्यासपीठ ठरत असल्याचे सुधाकर चिंचाणे यांनी यावेळी नमूद केले. नांदेड जिल्ह्यातील वाचक, अभ्यासक आणि साहित्यिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन साहित्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांनी केले. हे प्रदर्शन पुढील पंधरा दिवस सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

चकाट्या पिटण्यापेक्षा मणिपूरला जाऊन दाखवा; उद्धव ठाकरेंचा अमित शाहांवर हल्लाबोल



मुंबई/प्रतिनिधी- पुण्यामध्ये काल अजित पवार यांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नाव न घेता तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर देतांना शहा यांनी आपल्या कारकिर्दीत चकाट्या पिटण्याखेरीज त्यांनी दुसरे काय केले, असा सवाल ठाकरे यांनी केला. मणिपूरमध्ये जाऊन तेथील परिस्थितीचा आढावा घ्यावा. अरुणाचल प्रदेशातील नागरिकांचे प्रश्न ऐकून घ्यावेत आणि सीमाभागातील सैनिकांचे मनोधैर्य वाढवावे, असे आव्हानही त्यांनी दिले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यातील कार्यक्रमात केलेल्या टीकेला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. अमित शाह यांचा उल्लेख चकाट्या पिटणारे गृहमंत्री असा करत त्यांनी शाह यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अजित पवार हयात असताना त्यांच्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप करून त्यांचे राजकीय जीवन मुश्कील करण्यात आले. मात्र, त्याच अजित पवारांच्या पुतळ्याचे अनावरण अमित शाह यांच्या हस्ते झाले, हे दुर्दैवी असल्याचे ठाकरे म्हणाले. पुतळ्याचे अनावरण करण्यापूर्वी शाह यांनी अजितदादांची माफी मागायला हवी होती. आमचे आरोप चुकीचे होते, तुम्ही थोर होता, हे त्यांनी मान्य करायला हवे होते, अशी टीका त्यांनी केली. कोरोना काळात महाराष्ट्राने केलेल्या कामगिरीचा उल्लेख करत ठाकरेंनी केंद्र सरकारवरही निशाणा साधला. धारावीपासून संपूर्ण महाराष्ट्रात यंत्रणेने प्रभावी काम केले. उत्तर प्रदेश आणि गुजरातमधील कोरोना काळातील परिस्थितीचा दाखला देत महाराष्ट्राने संकटाचा समर्थपणे सामना केल्याचे ते म्हणाले. मात्र, निर्बुद्ध माणसासमोर काही बोलून उपयोग नसतो, असे सांगत त्यांनी गाढवासमोर वाचली गीता या म्हणीचा आधार घेत अमित शाह यांच्यावर टोला लगावला. अमित शाह यांनी आपल्याला फोन केले आणि आपण घेतले नाहीत, या दाव्यावरही ठाकरेंनी प्रत्युत्तर दिले. महाराष्ट्रात कोरोना काळात उत्तर प्रदेश किंवा गुजरातसारखी भयावह परिस्थिती निर्माण झाली नाही, हीच आपल्या कामाची साक्ष असल्याचे ते म्हणाले. देशाच्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून राजकीय आरोप करणाऱ्यांना सत्तेतून बाजूला करण्याची गरज आहे, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली.

आ.रोहित पवार यांच्या विरोधात बाळू खोमणे यांची इतवारा पोलीस ठाण्यात तक्रार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बदनामी व अवमान केल्याचा आरोप



नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेवून स्वर्गीय अजित पवार यांच्या विमान दुर्घटना प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर बिनबुडाचे आरोप केले आहेत. या प्रकरणी महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते महेश उर्फ बाळू खोमणे यांनी इतवारा पोलीस ठाण्यात आ.पवार यांच्या विरोधात तक्रार दिली आहे.

आ.रोहित पवार यांनी सोमवारी मुंबई येथे पत्रकार परिषद घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरुद्ध अत्यंत गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत. स्वर्गीय अजित पवार यांच्या विमान अपघातामागे घातपात असल्याचा आरोप करुन व्ही.के.सिंग व व्हीएसआर विमान कंपनीला वाचविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच नेते आहेत असा बिनबुडाचा आरोप आ.रोहित पवार यांनी केला. सदरील आरोप हे गंभीर स्वरुपाचे असून त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे ठोस पुरावे व अधिकृत निष्कर्ष नाहीत. राजकीय हेतुने अथवा वैयक्तीक स्वार्थापोटी अशा प्रकारचे वक्तव्य आ.रोहित पवार यांनी केले आहेत. स्वर्गीय अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेची चौकशी सुरु आहे. चौकशी समितीच्या अहवालामध्ये सत्य परिस्थिती समोर येईल. आ.रोहित पवार यांनी केलेले वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राजकीय सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील प्रतिमा मलिन होत असून त्यांच्या वैयक्तीक प्रतिष्ठेला धक्का पोहचत आहे. आ.रोहित पवार यांनी कोणत्याही पुराव्याविना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर व बदनामीकारक आरोप केले असून याप्रकरणी आ.पवार यांच्या विरोधात कायदेशिर कारवाई करावी अशी मागणी महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते महेश उर्फ बाळू खोमणे यांनी तक्रारीत केली आहे. यावेळी इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी महापौर सौ.कविता मुळे, विजय येवनकर, शितल खांडील, नगरसेवक उमेश चव्हाण, अभिषेक सौदे, किशनराव कल्याणकर, संघरत्न कांबळे, संदीप सोनकांबळे, महेंद्र देमगुंडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रतिनिधित्वाचा समतोल राखणे आवश्यक!

देशाच्या राजकारणात सध्या मतदारसंघ पुनर्रचनेचा अर्थात डिलिमिटेशनचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. लोकसंख्येतील वाढ, मतदारसंघांचा असमतोल आणि लोकप्रतिनिधींवरील वाढता कामाचा ताण या पार्श्वभूमीवर मतदारसंघांची पुनर्रचना आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, ही पुनर्रचना कोणत्या लोकसंख्येच्या आधारावर होणार, कोणत्या राज्याला किती प्रतिनिधित्व मिळणार आणि त्यातून देशाच्या राजकीय सत्तासंतुलनावर काय परिणाम होणार, हे प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत. विशेषतः लोकसंख्या नियंत्रणाच्या कार्यक्रमात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता ही गंभीर चिंतेची बाब आहे. अशा संवेदनशील विषयावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने घेतलेली सशर्त समर्थनाची भूमिका राजकीय चर्चेचा विषय ठरली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी डिलिमिटेशनच्या प्रस्तावाला तत्त्वतः अनुकूलता दर्शविताना सर्व राज्यांच्या लोकसभा जागांमध्ये समान टक्के वाढ करण्याचे सूत्र मांडले आहे. त्याचबरोबर महिला आरक्षणाची अंमलबजावणीही या प्रक्रियेसोबत व्हावी, अशी त्यांची भूमिका आहे. मात्र, संपूर्ण विधेयकातील तरतुदींचा अभ्यास केल्याशिवाय अंतिम निर्णय घेणे योग्य ठरणार नाही, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या या भूमिकेचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वागत केले, तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी या भूमिकेवर आक्षेप घेतला. त्यामुळे महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्येही मतभिन्नता समोर आली आहे. मात्र, या संपूर्ण चर्चेत सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांचे राजकीय प्रतिनिधित्व! देशातील काही राज्यांनी कुटुंबनियोजन, महिला शिक्षण, आरोग्य आणि लोकसंख्या नियंत्रणाच्या कार्यक्रमात उल्लेखनीय कामगिरी केली. विशेषतः दक्षिण भारतातील केरळ, तमिळनाडू, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या राज्यांनी लोकसंख्या वाढीचा दर नियंत्रित ठेवण्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न केले. शासनाच्या धोरणांना प्रतिसाद देत या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात यश मिळविले. मात्र, आता मतदारसंघांची पुनर्रचना लोकसंख्येच्या प्रमाणावर केली गेली, तर कमी लोकसंख्या वाढ असलेल्या राज्यांच्या लोकसभा जागांमध्ये तुलनेने कमी वाढ होण्याची किंवा त्यांचे राजकीय प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. दुसरीकडे, लोकसंख्या अधिक वेगाने वाढलेल्या राज्यांचे प्रतिनिधित्व वाढू शकते. मग प्रश्न असा आहे की, ज्या राज्यांनी राष्ट्रीय धोरणाचे पालन करून लोकसंख्या नियंत्रणात यश मिळविले, त्यांनाच त्याची राजकीय किंमत मोजावी लागणार का?



लोकसंख्या नियंत्रणात अपयशी ठरलेल्या राज्यांना अधिक जागा आणि यशस्वी राज्यांना तुलनेने कमी प्रतिनिधित्व, असे समीकरण निर्माण झाले तर तो कोणत्या न्यायाचा भाग ठरेल? लोकसंख्या नियंत्रण ही केवळ एका राज्याची जबाबदारी नसून देशाच्या विकासासाठी आवश्यक असलेली राष्ट्रीय मोहीम आहे. अशा मोहिमेत यशस्वी ठरलेल्या राज्यांना राजकीय प्रतिनिधित्वाच्या बाबतीत नुकसान सहन करावे लागणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे लोकसंख्येचा निकष महत्त्वाचा असला तरी तो एकमेव निकष असू शकत नाही. याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जनगणना! देशाची अद्ययावत जनगणना झाल्याशिवाय लोकसंख्येची वास्तविक स्थिती स्पष्ट होऊ शकत नाही. कोणत्या राज्यात किती लोकसंख्या वाढली, शहरीकरणाचा वेग किती आहे, स्थलांतरामुळे लोकसंख्येचे स्वरूप कसे बदलले आणि मतदारसंघांतील लोकसंख्येचे प्रमाण काय आहे, याची अधिकृत आकडेवारी उपलब्ध होणे आवश्यक आहे. जनगणनेच्या अद्ययावत आकडेवारी शिवाय मतदारसंघ पुनर्रचनेचा निर्णय घेणे म्हणजे अपुऱ्या माहितीच्या आधारावर देशाच्या लोकशाही प्रतिनिधित्वाची रचना ठरविण्यासारखे होईल. त्यामुळे प्रथम जनगणना पूर्ण करावी, तिचे निष्कर्ष जाहीर करावेत आणि त्यानंतर सर्व राज्यांना विश्वासात घेऊन डिलिमिटेशनची प्रक्रिया राबवावी, हीच लोकशाहीला सुसंगत भूमिका ठरेल. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने या प्रश्नाकडे केवळ राजकीय समर्थन किंवा विरोध या दृष्टिकोनातून न पाहता राष्ट्रीय हिताच्या भूमिकेतून पाहणे आवश्यक आहे. सुप्रिया सुळे यांनी मांडलेले समान जागावाढीचे सूत्र चर्चेसाठी महत्त्वाचे असले तरी त्यातील घटनात्मक तरतुदी, राज्यांचे प्रतिनिधित्व आणि लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांच्या हिताचे संरक्षण यावर स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे. काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांशीही याबाबत संवाद साधणे गरजेचे आहे. डिलिमिटेशन हा केवळ मतदारसंघांच्या सीमा बदलण्याचा विषय नाही, तर देशाच्या राजकीय भवितव्याचा आणि संघराज्यीय व्यवस्थेच्या समतोलाचा प्रश्न आहे. त्यामुळे घाईघाईने निर्णय घेण्याऐवजी जनगणना, पारदर्शकता, सर्वपक्षीय चर्चा आणि राज्यांचे न्याय्य प्रतिनिधित्व यांना प्राधान्य दिले पाहिजे. लोकसंख्या नियंत्रण करणाऱ्या राज्यांना त्यांच्या यशाची शिक्षा मिळता कामा नये आणि जनगणनेशिवाय डिलिमिटेशनची प्रक्रिया पुढे नेता कामा नये. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाचा आवाज महत्त्वाचा आहे; पण त्या आवाजाचे प्रतिनिधित्व करताना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही, याची काळजी घेणे हीच केंद्र सरकारची खरी कसोटी आहे!

धरतीआबांच्या जयंतीनिमित्त किनवटमध्ये आदिवासी अस्मितेचा जागर

नांदेड/प्रतिनिधी- आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, जल-जंगल-जमिनीच्या संरक्षणासाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणारे क्रांतिकारक जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त किनवट येथे जनजातीय गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आदिवासी समाजाच्या गौरवशाली परंपरा, संस्कृती आणि अस्मितेचा जागर करत शासकीय योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

किनवट येथील कार्यक्रमात आमदार भीमराव केराम यांनी भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन करून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. शासकीय योजना केवळ कागदावर न राहता त्यांचा प्रत्यक्ष लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट यांच्या वतीने गोकुंदा येथील के. के. गाडगे येथे जयंती व जनजातीय गौरव दिनानिमित्त शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी बी. सरवनन यांनी प्रास्ताविकातून ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान आयोजित जनजातीय गौरव दिन सेवा सप्ताहाची माहिती दिली. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना विविध शासकीय योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणारे महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त नारायण डिसाम, माधवराव मरसकोळे, दादाराव टेकाम आणि भीमराव शिरसाट यांचा प्रकल्प अधिकारी बी. सरवनन यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. आदिवासी बहुल भागातील नागरिकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार, उपजीविका आणि पायाभूत सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय भूमिका घ्यावी. योजनांच्या अंमल-बजावणीतील अडचणी दूर करून पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष आनंद मच्छरवार, साजिद खान, श्रीनिवास नेम्मानिवार, स्वागत आयनेनिवार, उमाकांत कराळे, संतोष मरसकोळे, दत्ता आडे, तुकाराम पेदर, डॉ. धुमाळे, सागर शिंदे, मुन्ना क्षीरसागर, प्रकाश कदम, बालाजी वामणे, जयवंत जाधव, गटविकास



अधिकारी जयश्री वाघमारे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रदीप नाईक, सुरजुसे, आडे, शेलके, कार्यालय अधीक्षक संदीप कदम, राजू भोंगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा यांच्या क्रांतिकारी विचारांचे स्मरण, आदिवासी समाजाच्या गौरवशाली परंपरांचा सन्मान आणि विकासाच्या संधी प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला. जनजातीय गौरव दिन हा आदिवासी समाजाच्या हक्क, स्वाभिमान आणि सर्वांगीण विकासासाठी सामूहिक बांधिलकी अधोरेखित करणारा ठरला.

उमरखेडमध्ये ३२ कडबा कुटी यंत्रांचे वाटप



उमरखेड/प्रतिनिधी-पशुसंवर्धन विभाग, उमरखेड आणि विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने उमरखेड येथे पशुपालकांसाठी कडबा कुट्टी यंत्र व चारा बियाणे वाटप तसेच एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यवतमाळ जिल्ह्याचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय उपायुक्त डॉ. मंगेश काळे यांनी केले. त्यांनी या प्रकल्पाचे महत्त्व तसेच पशुपालकांसाठी असलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून आ. किसनराव वानखेडे, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष नितीन भुतडा, जिल्हा परिषद सदस्य चितंगराव कदम, तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी डॉ. अविनाश राऊत, जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ.आकाश राठोड, डॉ.गोपाल गव्हाड, डॉ.नेहा पवार व डॉ.गोपाल ठाकूर यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते परिसरातील निवडक लाभार्थींना तब्बल ३२ कडबा कुट्टी मशीन्सचे वाटप करण्यात आले. पशुवैद्यकीय चिकित्सालय, पळशी अंतर्गत हे वाटप करण्यात आले. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात यंत्रांचे वाटप होणे, हे जिल्ह्यात किंबहुना महाराष्ट्रात प्रथमच घडल्याचे सांगण्यात आले. तर तालुक्यातील सुमारे अडीच हजार पशुपालकांना चारा बियाण्यांचे वाटप करण्यात आले. या शिवाय एकदिवसीय प्रशिक्षण शिबिरात दुग्धोत्पादन वाढ आणि पशुपालनातील आधुनिक पद्धतींवर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला पशुपालक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उमरखेडचे पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रतीक इंगळे यांनी केले.

दिवंगत पत्रकारांच्या आठवणींनी शोकसभा गहिवरली!

गणेश कस्तुरे व प्रदीप वाकोडीकर यांच्या कार्याचा उजाळा



नांदेड/प्रतिनिधी-दिवंगत ज्येष्ठ पत्रकार गणेश कस्तुरे आणि दैनिक देशोन्नतीचे किनवट तालुका प्रतिनिधी प्रदीप वाकोडीकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित शोकसभा आठवणींच्या भावस्पर्शी क्षणांनी गहिवरली. दोन्ही पत्रकारांच्या सहवासातील आठवणी सांगताना उपस्थितांचे कँठ दाटून आले. त्यांच्या पत्रकारितेतील योगदाना सोबतच त्यांनी जपलेल्या मैत्रीच्या आणि माणुसकीच्या नात्यांचा प्रत्यय या शोकसभेत आला.

गणेशचे अचानक निघून जाणे मनाला चटका लावणारे आहे. ज्या काळात आमची मैत्री अधिक बहरणार होती, त्याच काळात तो अचानक निघून गेला. त्याच्या जाण्याने माझे वैयक्तिक मोठे नुकसान झाले आहे, अशी भावना अमरावतीचे पोलीस आयुक्त महेश पाटील यांनी व्यक्त केली. गणेश कस्तुरे यांचा उल्लेख त्यांनी आपुलकीने 'भाऊ' असा केला. गणेश कस्तुरे यांच्या पत्रकारितेतील धाडसाचा आणि बातमीचा पाठपुरावा करण्याच्या वृत्तीचा उल्लेख करताना पाटील म्हणाले की, गणेशसारखा अभ्यासू, जिद्दी, मेहनती आणि बातमीचा शेवटपर्यंत पाठलाग करणारा पत्रकार होणे नाही. अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांच्या आठवणींनाही यावेळी उजाळा देण्यात आला. जुन्या जाणत्या पिढीतील निर्भीड, संयमी आणि अभ्यासू पत्रकार म्हणून वाकोडीकर यांची ओळख होती. मराठवाड्यातील पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला. त्यांची कारकीर्द पत्रकारितेच्या इतिहासात कायम स्मरणात राहील, अशा भावना ज्येष्ठ संपादक शंतनू डोईफोडे, संजीव कुलकर्णी, प्रकाश कांबळे, संतोष पांडागळे, अनिल कसबे आदींनी व्यक्त केल्या. शोकसभेत उपस्थित प्रत्येक पत्रकार गणेश कस्तुरे आणि प्रदीप वाकोडीकर यांच्या आयुष्यातील वेगवेगळ्या आठवणींच्या सागरात हरवून गेला होता. दोन पत्रकारांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या कार्याचा आणि माणुसकीचा वारसा जपण्याचा भाव या शोकसभेतून व्यक्त झाला. दिवंगत पत्रकार गणेश कस्तुरे आणि ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवार सायंकाळी ६ वाजता नांदेड शहरातील शिवाजी नगर पोलिस ठाण्यामागील नाना - नानी पार्क मधील कै. सुधाकरराव डोईफोडे सभागृहात शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या शोकसभेत अनेक मान्यवर पत्रकार शोकसंवेदना व्यक्त करत होते. शोकसभेचे निवेदन राम तरटे यांनी केले. या शोकसभेस अमरावतीचे अप्पर पोलिस आयुक्त महेश पाटील, ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी, प्रकाश कांबळे, ज्येष्ठ संपादक शंतनू डोईफोडे, जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष संतोष पांडागळे, मसाप शाखा नांदेडचे अध्यक्ष बालाजी इबितदार, ज्येष्ठ पत्रकार केशव घोणसे पाटील, अनिल कसबे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक प्रदीप नागापूरकर, ज्येष्ठ पत्रकार कालिदास जहागिरदार, विवेक केरुरकर, ज्येष्ठ संपादक सत्तार भाई, विजय होकार्णे, अनुराग पोवळे, बजरंग शुक्ला, महानगराध्यक्ष रवींद्र संगनवार, गोविंद मुंडकर, माधव अटकोरे, आनंद कुलकर्णी, लक्ष्मण भवरे, नरेश दंडवते, अविनाश भोसीकर, पुरुषोत्तम जोशी, प्रा. हामद, प्रा.देविदास शिंदे, संग्राम मोरे, प्रल्हाद लोहेकर, किरण कुलकर्णी, शरद काटकर, अभय कुळकजाईकर, गौतम कदम, स्वामी रामानंद तीर्थ प्राथमिक शाळेच्या अध्यक्षा अनिता हिंगोले, निलकंठ पाचांगे, महेंद्र देशमुख, राजेश पाडमुख, सूर्यकांत माली पाटील, प्रकाश चितळकर, योग शिक्षक सोनटक्के, रमेश पांडे, भास्कर ढवळे आदी पत्रकार उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

प्रलंबित मागण्यांसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपास प्रारंभ



किनवट/प्रतिनिधी- समान काम समान वेतन ही प्रमुख मागणी घेऊन महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १७ नोव्हेंबर पासून किनवट न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाला सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र स्टेट ज्युडिशियल स्टेनोग्राफर्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलिफ कर्मचारी महासंघ तसेच महाराष्ट्र राज्य न्यायालयीन गट-ड कर्मचारी महासंघ यांच्या संयुक्त आवाहनानुसार हा संप छेडण्यात येत असल्याचे संपकऱ्यांनी सांगितले.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाकडून ठोस निर्णय घेण्यात येत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. समान काम समान वेतन, या प्रमुख मागणीसह न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी संघटनांची प्रमुख मागणी आहे. यापूर्वी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १६ सप्टेंबर आणि १६ व १७ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून शासनाचा निषेध व्यक्त केला होता त्यावरही ठोस निर्णय न झाल्याने १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप करण्याचा निर्णय संघटनांनी घेतला त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी आजपासून सुरू केलीय. या पार्श्वभूमीवर किनवट न्यायालयातील सर्व कर्मचारी तथा न्यायालयीन सर्व सेवा निवृत्त कर्मचारी आजच्या संपात सहभागी झाले. मागण्या मान्य होऊन शासनाकडून ठोस निर्णय जाहीर होईपर्यंत बेमुदत संप सुरू ठेवण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी अपेक्षा संप कर्त्यांनी व्यक्त केली आहे.

२१ वर्षानंतर भोकरमध्ये जगद्गुरु नरेंद्राचार्य यांच्या सिध्द पादुकांचे आगमण



भोकर/प्रतिनिधी- अध्यात्म, मानवसेवा आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारे अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्ध पादुकांचा भव्य दर्शन सोहळा १८ नोव्हेंबर रोजी भोकर येथे आयोजित करण्यात आला आहे. तब्बल २१ वर्षानंतर या पवित्र पादुकांचे भोकर तालुक्यात आगमन होत आहे.

भोकर शहरातील हनुमान मंदिर परिसर, किनवट रोड येथे सकाळी ९ वाजल्यापासून सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. यानिमित्त भव्य शोभायात्रा, पादुका आगमन, गुरुपूजन, आरती, प्रवचन, उपासक दीक्षा आणि दर्शन अशा विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम होणार आहेत. या सोहळ्यात देखील अनेक गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात येत आहे. जानेवारी २०२५ मधील रक्तदान महाअभियानातून १ लाख ७१ हजार १५० रक्तपिशव्या शासनाकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत. तसेच मागील वर्षी ६, १८, ००९ वृक्षारोपण ही करण्यात आले. ५४ रुग्णवाहिका राष्ट्रीय महामार्गांवर सेवेत कार्यरत आहेत. शासनाच्या खांद्याला खांदा लावून सामाजिक उत्तरदायित्व पार पाडणारा रामानंद संप्रदाय मानवसेवा हीच ईश्वरसेवा या विचाराचा जागर आहे होणार आहे. या सोहळ्याचे आयोजन रामानंद संप्रदाय तालुका सेवा समिती, भोकर व जिल्हा सेवा समिती, नांदेड यांच्या वतीने करण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यातील १६ तालुके पाणीटंचाई क्षेत्र घोषित;विहिरी व बोअरवेल खोदकामावर निर्बंध

नांदेड/प्रतिनिधी-खरीप हंगामात झालेली पर्जन्याची मोठी तूट आणि जिल्ह्यातील भूजल पातळीत झालेली घट लक्षात घेऊन नांदेड जिल्ह्यातील सर्व १६ तालुके पाणीटंचाई क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर भूजल उपशावर निर्बंध घालण्यासह नवीन विहिरी व बोअरवेल खोदकामासाठी कडक नियम लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण आदेश जारी केले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या २५ सप्टेंबर व १४ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांतील ग्रामीण व नागरी क्षेत्रे पुढील एक वर्षासाठी किंवा पुढील आदेशापर्यंत 'पाणीटंचाई क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आली आहेत. जिल्ह्यात शेती अथवा औद्योगिक वापरासाठी ६० मीटरपेक्षा अधिक खोल विहीर किंवा बोअरवेल खोदण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून ५०० मीटरच्या परिघात कोणत्याही प्रयोजनासाठी नवीन विहीर अथवा बोअरवेल खोदता येणार नाही. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून एक किलोमीटर अंतराच्या परिघातील किंवा प्रभाव क्षेत्रातील खासगी विहिरी व बोअरवेलमधून व्यावसायिक अथवा सिंचनासाठी अनिर्बंध भूजल उपसा करण्यावर तात्पुरते निर्बंध घालण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी अशा विहिरींचे तात्पुरते अधिग्रहण करण्याचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांना देण्यात आले आहेत. जिल्हा प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय भूजलाची व्यावसायिक विक्री अथवा टँकरद्वारे अनिर्बंध वाहतूक करण्यास मनाई करण्यात आली आहे. या निर्णयामुळे पिण्याच्या पाण्याचा अनधिकृत व्यावसायिक वापर आणि विक्री रोखण्यास मदत होणार आहे.

रुग्णवाहिका रस्त्यातच बंद; सर्पदंश व महिला प्रसूती झालेल्या रुग्णाचा जीव टांगणीला

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू आहे की काय, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सर्पदंश झालेला रुग्ण आणि प्रसूती झालेली महिला अशा दोन गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका व्यवस्थेतील त्रुटी समोर आल्या आहेत.

धर्माबाद तालुक्यातील मौजे बामणी येथील रहिवासी अशोक पिराजी तापलोड यांना साप चावल्याने उपचारासाठी धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले होते. डॉक्टरांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी निजामाबाद येथे पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी शासकीय रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली. मात्र, दुर्दैवाने ही रुग्णवाहिका अतिथी बारजवळ अचानक रस्त्यातच बंद पडली. सर्पदंश झालेल्या रुग्णासाठी उपचाराचा प्रत्येक क्षण महत्त्वाचा असताना तब्बल ३५ मिनिटे दुसरे वाहन उपलब्ध झाले नाही, अशी माहिती समोर आली आहे. अखेर उपस्थित वाटसरूंनी पुढाकार घेत दुसऱ्या वाहनाची व्यवस्था केली आणि रुग्णाला पुढील उपचारासाठी रवाना करण्यात आले. दुसरीकडे, प्रसूती झालेल्या महिलेला पुढील उपचारासाठी पाठविण्याकरिता बिलोली येथून रुग्णवाहिका बोलावण्यात आल्याची माहिती आहे. धर्माबादमध्ये रुग्णवाहिका उपलब्धतेचा प्रश्न किती गंभीर आहे, हे या घटनेतून स्पष्ट होत आहे. या दोन्ही रुग्णांची प्रकृती गंभीर असताना रुग्णवाहिकेत ऑक्सिजन मशीन आणि तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. जर रुग्णवाहिकाच वेळेवर उपलब्ध होत नसेल, ती रस्त्यातच बंद पडत असेल आणि आवश्यक वैद्यकीय सुविधा नसतील, तर आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांनी जीव वाचवण्यासाठी नेमके कोणाकडे धाव घ्यायची? या दोन्ही रुग्णांची प्रकृती गंभीर असताना रुग्णवाहिकेत ऑक्सिजन मशीन आणि तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी आणि धर्माबाद ग्रामीण रुग्णालयातील रुग्णवाहिका सेवा सक्षम करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

सौ.पुनमताई पवार यांच्या उत्तम आरोग्यासाठी राहेरच्या नरसिंह देवाला साकडे



नायगाव/प्रतिनिधी-श्रद्धा, भक्ती आणि माणुसकीचा अनोखा संगम राहेर येथील पवित्र तीर्थक्षेत्र श्री नरसिंह मंदिरात पाहायला मिळाला. सौ. पुनमताई राजेश पवार यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होऊन त्यांनी आजारावर मात करावी, त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे, या सद्भावनेतून जागृत देवस्थान श्री नरसिंह मंदिरात विशेष अभिषेक, महापूजा व महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी श्री नरसिंह देवाच्या चरणी मनोभावे साकडे घातले.

या धार्मिक विधीमध्ये जयश्री बालाजी नरवाडे व बालाजी नरवाडे यांनी सपत्नीक अभिषेकाला बसून विधिवत पूजा-अर्चा केली. श्री नरसिंह मंदिर देवस्थानचे पुरोहित तथा पुजारी धनंजय देशमुख महाराज आणि मंदिरातील पुजारी संतोष महाराज यांच्या मंत्रोच्चारात श्री नरसिंह देवाचा अभिषेक व महापूजा संपन्न झाली. त्यानंतर भक्तिभावाने महाआरती करण्यात आली. पुनमताई पवार यांनी आजारातून लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावे, त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, तसेच त्यांच्या हातून यापुढेही जनसामान्यांची सेवा आणि सामाजिक कार्य अखंडपणे घडत राहावे, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी उपस्थितांनी एकजुटीने नरसिंह देवाकडे आशीर्वाद मागितले. या प्रसंगी राहेरचे सरपंच व्यंकटराव पाटील राहेरकर, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष दत्ता पाटील ढगे, अशोक गायकवाड साहेब, पिर्याताई जोशी, पत्रकार गणेश कंदुरके, लक्ष्मण पाटील हिवराळे, यशवंत पाटील हिवराळे, दिगंबर बारोळे, गोविंद पाटील नरवाडे यांच्यासह गावातील नागरिक व भाविक उपस्थित होते.

कुंडलवाडी येथे भगवान बिरसा मुंडा पुतळ्याच्या कामाचे भूमीपुजन संपन्न



कुंडलवाडी/प्रतिनिधी-अदिवासी समाजाचे महानायक थोर क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंती निमीत्त कुंडलवाडी शहरात पुतळा अनावरणच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन रविवार दि.१५ नोव्हेंबर रोजी मुख्य बाजार पेठेत न.प.च्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न.प. अध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार ह्या होत्या.

यावेळी बोलताना न.प. अध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार बोलतांना म्हणाले की, भगवान बिरसा मुंडा हे एका समाजाचे नेते नसून त्यांनी स्वातंत्र लढ्याच्या काळात जुलमी इंग्रज राजवटीच्या विरुद्ध लढा दिला होता. त्यांचे विचार, त्याग आणि संघर्ष नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत व त्यांचा पुतळा लवकरात लवकर पूर्ण होईल व कुंडलवाडी शहरातील समाज बांधवाची खुप दिवसा पासून असलेली इच्छा पूर्ण होईल असा विश्वास व्यक्त केला तर लक्ष्मण ठक्करवाड यांनी कुडंलवाडी येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचे भूमीपूजन होत असल्याने न.प. अध्यक्षा व नगर परिषदेचे अभिनंदन केले. या वेळी सपोनि गणेश कराड, माजी नगराध्यक्ष भूमन्ना ठक्कुरवाड, पो. उप. नि. गजेंद्र मांजरमकर, नागनाथ तुम्मोड, डॉ. सारिका अनमुलवाड, नगर सेवक राजेश्वर उत्तरवार, नगरसेवक प्रशांत सब्बनवार, साईनाथ उत्तरवार, गंगाधर पोरडवार उमांकात गोपछडे, बाबाराव भाले, शिवाजी पोरडवार, गंगाधर पुप्पलवार, राजेंद्र तोटावाड, गंगाधर पापूलवार अदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी न.प.सदस्य राजेश्वर उत्तरवार, सायारेड्डी ठक्कूरवाड, अमरनाथ कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सुत्र संचलन डॉ. नरेश बोधनकर तर आभार प्रदर्शन प्रशांत सब्बनवार यांनी केले.

उस्मानशाही मिल पुनर्जीवनासाठी जागरण सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद

नांदेड/प्रतिनिधी- नांदेडच्या औद्योगिक वैभवाचे प्रतीक असलेल्या उस्मानशाही मिलचे पुनर्जीवन करून ती पुन्हा सुरू करावी, या मागणीसाठी सुरू असलेल्या जागरण सप्ताहाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी शहरातील विविध वार्डांमध्ये स्वाक्षरी मोहीम राबवून मिल सुरू करण्याच्या मागणीला जनसमर्थन मिळविण्यात आले.

ललिता कुंभार, डॉ.किरण चिद्रावर, रोहन कहाळेकर, दीपक सातोरे, सुभाष लोखंडे, सुमेध वाघमारे, शेख अन्सार, शेख फारूक शेखबाबू आणि कमळ गवळी यांच्या पुढाकारातून विविध भागांत ही मोहीम राबविण्यात आली. नागरिकांनी स्वाक्षऱ्या करून मिल पुनर्जीवनाच्या मागणीला पाठिंबा दिला. या मोहिमेत वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक प्रतिनिधी राक्षसमारे, नगरसेवक सत्यपाल सावंत, मुन्ना अब्बास, काँग्रेस नेत्या डॉ. रेखा चव्हाण, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, काकासाहेब डावरे आणि उस्मानशाही मिल संवर्धन समितीचे समन्वयक श्याम निलंगेकर सहभागी झाले. उस्मानशाही मिल पुन्हा सुरू झाल्यास कामगारांसह व्यापारी, शेतकरी आणि तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन शहराच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. त्यामुळे शासनाने मिलच्या पुनर्जीवनाबाबत तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. जागरण सप्ताहात यापुढेही प्रत्येक वार्डात स्वाक्षरी मोहीम आणि जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

दुचाकीच्या धडकेने महिलेचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-भरधाव वेगातील दुचाकीने धडक दिल्याने एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी बागनटाकळी ते खानापूर रोडवर घडली आहे.

रमाबाई भीमराव सोनकांबळे (वय ६०) रा. मुजळगा ता.देगलूर ह्या सोमवारी सायंकाळी पायी जात असतांना अज्ञात दुचाकी चालकाने रमाबाई सोनकांबळे यांना धडक दिली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **FARHAT TAYYABA ABDUL MUQUEET** which now I am, changing as (new name) **FARHAT TAYYABA**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address
9-5-1241,Hilal Nagar,Degloor Naka,
Nanded-431604
M No-9890412183

CHANGE IN NAME

My (old name) is **PATHAN AIJAZ KHAM** which now I am, changing as (new name) **PATHAN AIJAZ KHAN RASHID KHAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address
961,Balirampur Nanded-431603
M No- 8888013812

राहुल वंदने यांचे दुःखद निधन

नांदेड/प्रतिनिधी-डॉ.आंबेडकर नगर नांदेड येथील रहिवासी राहुल रमेश वंदने (वय ३२) यांचे सोमवार दि.१६ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने दुःख निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर शांतीधाम गोवर्धनघाट स्मशानभूमी नांदेड येथे शोकाकुल वातावरणात रात्री ८ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, तीन बहिणी, मेहुणे, असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते रमेश वंदने यांचे ते सुपुत्र होत. सामाजिक कार्यकर्ते सुभाष काटकांबळे, विजय मिस्त्री काटकांबळे, राजू काटकांबळे, सिद्धार्थ काटकांबळे यांचे भाचे होत.



वाढदिवसाच्या खर्चाला फाटा देत १२१ गायींना ६० लाखांचे विमा कवच


उमरखेड/प्रतिनिधी- दुष्काळात शेतकऱ्याचे पशुधन हाच त्याचा खरा आधार असतो. हीच जाण ठेवत डॉ. विजयराव माने व ॲड.अर्चना माने यांनी आपल्या वाढदिवसा निमित्त तालुक्यातील १२१ दुधाळ गायी-म्हशींना एकूण ६० लाख ५० हजार रुपयांचे विमा कवच दिले आहे. याची माहिती दूध संघाचे अध्यक्ष देवानंद मोरे यांनी दिली.

वाढदिवसावर अनावश्यक खर्च टाळून शेतकऱ्यांना भविष्यातील संकटातून आर्थिक संरक्षण मिळावे, पशुधन विम्याबाबत जागरूकता वाढावी, हा यामागचा उद्देश आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी देवानंद मोरे यांच्या देखरेखीखाली शिवानी मल्टीसर्विसेसचे संचालक पवन हामंद व आयसी विमा प्रतिनिधी विजय चव्हाण यांच्या माध्यमातून होणार आहे. उद्घाटन प्रसंगी संगम चिंचोली येथील शिवाजी रानबाजी नवसागरे यांच्या गायी-म्हशीचा ऑनलाईन विमा काढून उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. डॉ. विजयराव माने यांचा शेतकऱ्यांच्या पशुधनाला आर्थिक संरक्षण देण्याचा हा स्तुत्य संकल्प आहे, असे देवानंद मोरे यावेळी म्हणाले. यावेळी बालाजीराव वानखेडे, शिवाजीराव माने, आनंदजी मत्ते, विलास नावडे, सुनील वानखेडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

हदगाव शहरात पॉलीथिन,डिस्पोजलचा सर्रास वापर; सार्वजनिक ठिकाणी कचराकुंड्यांचा अभाव

हदगाव/प्रतिनिधी- हदगाव शहरात प्लास्टिकच्या पिशव्या (पॉलीथिन) आणि डिस्पोजल वस्तूंचा वापर दिवसेंदिवस वाढत असून, त्याचा परिणाम शहराच्या स्वच्छतेवर आणि पर्यावरणावर होताना दिसत आहे.

एकीकडे प्लास्टिक वापरावर बंदी असतानाही शहरातील दुकाने, हॉटेल्स आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये पॉलीथिन व डिस्पोजलचा सर्रास वापर सुरू आहे. तर दुसरीकडे शहरातील अनेक भागांत कचराकुंड्यांची पुरेशी व्यवस्था नसल्याने नागरिकांना कचरा टाकण्यासाठी योग्य जागाच उपलब्ध होत नसल्याचे चित्र आहे. शहरातील विविध रस्त्यांच्या कडेला, नाल्यांमध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जात असल्याने अनेक भागांत अस्वच्छता पसरली आहे. विशेष म्हणजे या कचऱ्यामध्ये सर्वाधिक प्रमाण प्लास्टिकच्या पिशव्या आणि डिस्पोजल वस्तूंचे असल्याचे दिसून येत आहे. प्लास्टिकचा कचरा नाल्यांमध्ये साचल्याने पाण्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असून, दुर्गंधी आणि प्रदूषणाची समस्याही वाढत आहे. हदगाव शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणी कचराकुंड्या उपलब्ध नसल्याने नागरिकांकडून मिळेल त्या ठिकाणी कचरा टाकला जात आहे. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, वस्ती परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी नगरपरिषद प्रशासनाने पुरेशा प्रमाणात कचराकुंड्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मात्र, योग्य व्यवस्था नसल्याने रस्त्याच्या कडेला आणि नाल्यांमध्ये कचऱ्याचे ढीग साचत आहेत. त्यामुळे शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे शासनाने प्लास्टिकच्या काही प्रकारांवर बंदी घातलेली असतानाही शहरात पॉलीथिन पिशव्यांची विक्री आणि वापर खुलेआम सुरू असल्याचे चित्र आहे. अनेक दुकानदार ग्राहकांना प्लास्टिकच्या



पिशव्यांमधून वस्तू देत आहेत, तर हॉटेल आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून डिस्पोजल साहित्याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून अधूनमधून कारवाई केली जात असली तरी त्याचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. केवळ कारवाई करून प्रश्न सुटणार नसून, सातत्यपूर्ण तपासणी आणि जनजागृतीचीही गरज आहे. पॉलीथिन आणि डिस्पोजल वस्तूंमुळे केवळ शहरात कचऱ्याचे प्रमाण वाढत नाही, तर पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण होत आहे. रस्त्यावर टाकलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या भटक्या जनावरांच्या पोटात जात असून, त्यामुळे त्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो. प्लास्टिक खाल्ल्यामुळे अनेक जनावरांना जीव गमवावा लागल्याच्या घटनाही घडत आहेत.

पक्षांतर्गत मतभेद म्हणजे पक्षांतर नव्हे

शिंदे गटाचा सुप्रीम कोर्टात युक्तिवाद

नवी दिल्ली- शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाचे वकील ध्रुव मेहता यांनी पक्षांतर्गत मतभेद म्हणजे पक्षांतर नव्हे, अशी भूमिका त्यांनी न्यायालयात मांडली. आपला युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी आणखी दोन तास लागतील, असे त्यांनी न्यायालयाला सांगितले. त्यामुळे मंगळवारी झालेली सुनावणी संपली असून बुधवारी दुपारी दोन वाजता पुन्हा सुनावणी होणार आहे.

ध्रुव मेहता यांनी शिंदे गटाची बाजू मांडताना पक्षातील अंतर्गत मतभेद आणि पक्षांतर यामध्ये फरक असल्याचे स्पष्ट केले. केवळ पक्षांतर्गत असहमतीच्या आधारावर आमदारांना अपात्र ठरवता येणार नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. या प्रकरणात दहाव्या अनुसूचीतील तरतुदींचा विचार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. मेहता यांचा युक्तिवाद अद्याप पूर्ण झालेला नसल्याने उद्याच्या सुनावणीत ते आपली बाजू मांडणे सुरू ठेवणार आहेत. त्यांचा युक्तिवाद संपल्यानंतर उद्धव ठाकरे गटाकडून प्रतिवाद केला जाणार आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावरील न्यायालयीन लढाईतील पुढील घडामोडींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



श्री क्षेत्र कपिलधारा पायी दिंडीचे लोहा येथे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी स्वागत केले. यावेळी नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, माजी नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण, भारत पाटील पवार, अमोल स्वामी, काकाजी पवार यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. (छाया : विनोद महाबळे,लोहा)

ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजनेत बोगस लाभार्थ्यांचा भरणा

समितीवर कारवाई करण्याची मागणी

मुखेड/प्रतिनिधी- महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालया मार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजने'अंतर्गत नांदेड जिल्ह्यात ३०० कलावंतांची निवड करण्यात आली आहे. मात्र, या निवड प्रक्रियेत पारदर्शकता पाळली गेली नसून ग्रामीण भागातील खऱ्या कलावंतांवर अन्याय करत बोगस लाभार्थ्यांचा भरणा करण्यात आल्याचा गंभीर आरोप सांस्कृतिक व साहित्यिक कला समितीचे नांदेड जिल्हाध्यक्ष व्यंकटराव गुळवे महाराज यांनी निवेदनाद्वारे केला आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागामार्फत सन २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या तीन वर्षांतील प्रलंबित अर्जांची छाननी करून ४ ते ८ मे दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयात कलावंतांचे प्रत्यक्ष सादरीकरण घेण्यात आले होते. यातून ३५ गुणांच्या निकषानुसार ३०० कलावंतांची निवड करण्यात आली असून त्यापैकी १८४ जणांना प्रत्यक्ष लाभ सुरू झाला आहे.परंतु, मे महिन्यात झालेल्या या सादरीकरण व निवड प्रक्रियेदरम्यान अशासकीय समितीच्या काही सदस्यांनी गैरप्रकार करत प्रत्येकी ५० हजार रुपये घेऊन बोगस कलावंतांची निवड केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या अन्यायाविरोधात यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अशासकीय समिती रद्द करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने जुनाच कारभार सुरू असल्याची खंत निवेदनात व्यक्त केली आहे. प्रशासनाने या गंभीर गैरकारभाराची तात्काळ दखल घेऊन भ्रष्ट कारभार करणाऱ्या अशासकीय समितीवर कठोर कारवाई करावी आणि संपूर्ण निवड प्रक्रियेची पारदर्शक माहिती जाहीर करावी. अन्यथा, आपल्या न्याय्य हक्कांसाठी जिल्ह्यातील तमाम साहित्यिक व कलावंत पुन्हा एकदा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा व्यंकट महाराज गुळवे यांनी दिला आहे.

पैनगंगेच्या पात्रातून रेतीचा उपसा रात्रं-दिवस सुरु;रेती तस्करांवर मोका लावण्याची मागणी

किनवट/प्रतिनिधी- पैनगंगेसह नदीनाल्यातील रेतीघाटाचा लिलाव नसताना सुद्धा अवैध उत्खनन आणि विनापरवाना वाहतूक सलग चालू आहे. त्यात अधिकची भर म्हणून माहूर तालुक्यातील रेती चोरट्यांनी किनवट शहरासह तालुक्यात खुल्लेआम भरदिवसा रेती पुरवठा करण्यावर जोर दिलाय. उत्खनन करून साठेबाजी करायची. साठा जप्त करून नाट्यमय लिलाव करून त्याच तस्करांना द्यायचा. त्याच लिलावाच्या आधारे त्या रेतीसह पुन्हा पैनगंगेतील रेतीवर डल्ला मारायचा. यात किनवट आणि माहूर महसूल विभागातील संबंधितांचे हात बरबटले असलेतरी जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेऊन रेती तस्करांवर मोका लावावा या मागणीने जोर धरलाय.

रेती चोरीची सर्वत्र ओरड चालू असताना किनवट आणि माहूर महसूल यंत्रणेच्या कानापर्यंत आवाज पोहोचत नाही का? असा सवाल व्यक्तविने स्वाभाविक आहे. वेळोवेळी तक्रारी सुद्धा केल्या तरी त्या तक्रारींना कचराकुंडी दाखवली जाते असा तक्रारकर्त्यांचा आरोप आहे. तुम्ही करा वटवट-आम्ही आहेत रामधट, या प्रवृत्तीचा प्रत्येय दिसून येतोय. दुष्काळी परिस्थिती असल्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून पैनगंगेसह नदीनाल्यातील कृषी पंपाचा विद्यूत कनेक्शनच काढून टाकले. मग रेती चोरीवर जिल्हाधिकाऱ्यांचे मौन का? इथेच माशी शिंकल्याच्या शंकाना वाव मिळताना दिसतोय. किनवट तालुक्यातील भंडारवाडी, पिंपरी, येन्दा-पेन्दा, भूलजा, मदनापूर, कोठारी, गोकुंदा, किनवट-तीनफाटा, मालेगाव, लक्कडकोट, मोहपूर, खंबाळा अशा अनेक पैनगंगाकिनारी गावात चोरट्या रेतीचा भरमसाठ उपसा आणि अवैध पुरवठा चालू आहे. टाकळी, नेर, लिंबायत, हिंगणी, सायफळ अशा विविध रेतीघाटातून माहूर तालुक्यातील चोरटी रेती रात्रंदिवस पुरवठा होत आहे. राजकीय नेत्यांच्या अवतीभोवती आश्रय घेऊन फुकटच्या रेतीवर करोडो रुपयांचा डल्ला मारला जातोय. यात महसूल यंत्रणेचे हात काळेबेरे झाल्याशिवाय एवढ्या उजळ माथ्याने तस्करी होऊच शकत नाही असा संतप्त नागरिकांचा सूर ऐकायला मिळतोय. मंत्र्यांच्या दौऱ्यात गैरहजरी, लाचखोरीत महिला ग्राम महसूल अधिकारी रंगेहाथ चतुर्भुज, इस्लापुरातील नियोजित पेट्रोल पंपाच्या जमीन प्रकरणातील लाचखोरीच्या आरोपातून उपविभागीय अधिकारी स्तरीय चौकशी, आमदारांनी महसूल मंत्र्यांना हातोहात दिलेल्या तक्रारीनंतर मंत्र्यांनी लावलेल्या विभागीय चौकशीनंतरही तहसीलदारांना धक्का लागलेला नसल्याने सर्वांना तोंडात बोट घालून खामुश बसण्याची वेळ आलीय यापेक्षा किनवटकरांचे दुर्देव ते कोणते असणार आहे. म्हणूनच येथील यंत्रणेवर मंत्र्यांसंत्र्यांचा वरदहस्त असावा असा सर्वत्र कयास लावला जात आहे.

कापूस वेचणीला मजूर टंचाईचा फटका;शेतकऱ्यांची धावपळ

देगलूर/प्रतिनिधी- देगलूर तालुक्यातील यंदाच्या कापूस वेचणी हंगामाला सुरुवात झाली आहे. शेतात कापूस बोंडातून बाहेर पडून वेचनीसाठी तयार असला, तरी आवश्यक्य मजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. कापूस वेचणीसाठी मजूर शोधताना शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे.

यंदा कमी पावसामुळे खरीप पिकांच्या उत्पादनात घट झाली असून शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत आहेत. त्यात दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील अनेक मजूर कुटुंबे रोजगाराच्या शोधात हैदराबाद, पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक आधी शहरांकडे स्थलांतरित झाले आहेत. परिणामी शेतीच्या हंगामात मजुरांची उपलब्ध कमी झाली आहे. अधिक मजुरी देण्याची तयारी असूनही वेळेवर कामगार मिळत नसल्याची परिस्थिती आहे. कापूस वेचणीला उशीर झाल्यास बोंडातील कापूस खाली पडणे, बोलाव्यामुळे दर्जा खालावणे आणि उत्पादनाचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे वेचणीचा खर्च वाढून आर्थिक गणित कोलमडण्याची शक्यता आहे. कमी उत्पादन, वाढती मजुरी आणि वेळेत वेचणी न झाल्यास होणारी संभाव्य नुकसान अशा तिहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. शासनाने ग्रामीण भागात रोजगारांच्या संधी निर्माण करून शेतीमालाला योग्य भाव द्यावा आणि शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यातून होत आहे.

नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित

पीपल्स हायस्कूल गोकुळ नगर नांदेड.

निविदा

नांदेड एज्यूकेशन सोसायटी संचलित पीपल्स हायस्कूल गोकुळ नगर नांदेड येथे G+4 मजल्याचे प्रत्येकी मजला ५००० स्क्वे.फूट प्रमाणे नविन बांधकामाची सुरुवात करावयाची आहे. सदरील बांधकामासाठीची मजूरी व लागणारे दर्जेदार कंपनीचे साहित्य खरेदीसाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	मजुरी व बांधकाम साहित्य	दर
१	बांधकाम मजूरी Elevation सोबत - (चटई क्षेत्रा प्रमाणे)	प्रति स्क्वे.फुट
२	गजाळी 8,10,12,16,18,20 mm (पोलाद, राजूरी, कालीका, कामधेनू)	प्रति टन
३	सिमेन्ट	प्रति बॅग
४	वाळू	प्रति ब्रास
५	मुरुम	प्रति ब्रास
६	धुम्मस करणे मजूरी	प्रति ब्रास
७	चूरी (Crush Sand)	प्रति ब्रास
८	गिट्टी $^1/_2$" x $^3/_4$"	प्रति ब्रास
९	इलेट्रीकल वायरिंग	प्रति पॉईन्ट
१०	जे.सि.बी.मशिन भाडे	प्रति तास
११	टिप्पर भाडे	प्रति ८ तास

संबधितांनी सदर बांधकाम साहीत्य व मजूरीच्या निविदा बंद पाकिटात दि.२५/११/२०२६ पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत नांदेड एज्यूकेशन सोसायटी कार्यालयात सादर कराव्यात.

नोट : निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा.सचिव राखून ठेवत आहेत.

सचिव
स्वाक्षरित/-
नांदेड एज्यूकेशन सोसायटी,
स्नेह नगर, पीपल्स कॉलेज कॅम्पस,नांदेड-४३१६०५

जातीअंत संघर्ष समितीच्या स्वागताध्यक्षपदी प्रवीण पाटील

नांदेड/प्रतिनिधी- जातीअंत संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्याच्या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्ष-पदी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रवीण पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

समितीचे महाराष्ट्र राज्य अधिवेशन २१ व २२ नोव्हेंबर रोजी नांदेड येथील कौठा परिसरातील सप्तगिरी बँक्वेट हॉलमध्ये आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात राज्यभरातील प्रतिनिधी सहभागी होणार असून, समितीच्या मागील कार्याचा आढावा, संघटनात्मक बळकटीकरण आणि आगामी कार्याची दिशा यावर चर्चा होणार आहे. जातीविहीन, वर्गविहीन आणि स्त्री-पुरुष समानतेवर आधारित शोषणमुक्त समाजनिर्मितीचे उद्दिष्ट घेऊन समिती सामाजिक अन्याय व अत्याचाराच्या



घटनांमध्ये हस्तक्षेप करीत आहे. संविधानाचे संरक्षण, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक समतेच्या मुद्द्यांवरही अधिवेशनात विचारमंथन होणार आहे. अधिवेशनाच्या संयोजन समितीचे अध्यक्ष कॉ. विजय गाभणे, कार्याध्यक्ष कॉ. आदिनाथ इंगोले, सहकार्याध्यक्ष कॉ. उज्ज्वला पडलवार, सचिव कॉ. गंगाधर गायकवाड, कॉ. जनार्दन काळे, ड. मिलिंद सर्पे, डॉ. अशोक बनसोड आणि डॉ. प्रमोद वाघमारे यांनी ही माहिती दिली.

पान १ वरुन

मंत्रिमंडळाचे चार महत्त्वाचे...

करण्यासह उद्योगांच्या विस्तारीकरणाच्या नियमांतही बदल करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे पालघरमधील वस्त्रोद्योगाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. पालघर येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय आणि मुख्य दंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. यासाठी सरकारी वकील कार्यालयासह आवश्यक अनुषंगिक पदांची निर्मितीही करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाज अधिक सुलभ होणार आहे. सुरक्षा दलांकडून यापूर्वी नक्षलवाद्यांनी लुटून नेलेल्या शस्त्रांची माहिती देणाऱ्यांसाठी सरकारने रोख बक्षीस योजना जाहीर केली आहे. नक्षलवाद्यांकडील शस्त्रे परत मिळविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. दरम्यान, राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधानसभा आणि विधान परिषदेतील सर्व आमदारांनी एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्रिमंडळ बैठकीदरम्यान उपमुख्यमंत्री तथा पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी वेतनाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले.

मुख्यमंत्र्यांवरील आरोपावरुन...

स्पष्ट केले. 'माझी बांधिलकी विचारांशी, अजितदादांशी आणि महाराष्ट्रातील जनतेशी आहे. गेल्या काही दिवसांपासून बोलणाऱ्या नेत्यांना उत्तर देणे मला गरजेचे वाटत नाही. योग्य वेळी योग्य उत्तर देईन,' असा इशारा त्यांनी दिला.

अवैधरित्या रेती वाहतूक...

दुसऱ्या पथकाने भगवानबाबा चौकात रेती वाहतूक करणारा हायवा ट्रक पकडला आहे. या प्रकरणी गणेश दशरथ गायकवाड रा.बाभुळगाव व मधुकर अरुण दिघे रा.कारेगाव याच्या विरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४